| | |
|---|---|
| कुल प्रश्नों की संख्या : 25 | कुल पृष्ठों की संख्या : 07 |
| Total No. of Questions: 25 | Total No. of Pages: 07 |

# 204

## विषय : मराठी

## Subject: MARATHI

| | |
|---|---|
| समय : 03 घण्टे | पूर्णांक : 100 |
| Time: 03 Hours | Maximum Marks: 100 |

*निर्देश–*

*(1) प्रश्न क्र. 1 ते प्रश्न क्र. 5 वस्तुनिष्ठ प्रश्न आहेत.*

*(2) प्रश्न क्र. 6 ते 25 प्रत्येक प्रश्न विकल्प दिले आहेत.*

*(3) प्रत्येक प्रश्नासमोर निर्धारित अंक दिले गेले आहेत.*

*(4) सर्व प्रश्न सोडविने आवश्यक आहे.*

प्र.1 रिकाम्या जागी कसांतील योग्य पर्याय निवडून लिहा. (5)

(1) लेखकांना सुंदर ...............................पाहून आनंद होतो. (पक्षी, चित्रपट, खेळणी)

(2) पिळवणूक पाडील ..............................आम्हा असो कोणाचीही। (चीड, शीण, पीळ)

(3) कवीला भेटायला आलेल्या विद्य्यार्थ्याचे कपडे...................................होते. (कर्दमलेले, किडलेले, फाटलेले)

(4) प्रा. कार्व्हर यांना विद्य्यार्थ्याच्या मनातील .................................विद्येबद्दलची अढी दूर करायची होती. (कृषि, कारागिरी, शस्त्रविद्या)

(5) बियावर पसरलेल्या मातीस ..........................................म्हटले आहे. (धरत्री, भुई, शाल)

प्र.2 योग्य जोडया जुळवा (5)

| (अ) | | (ब) | |
|---|---|---|---|
| (1) | भूमिहीन | (i) | केशवसुत |
| (2) | विहीर | (ii) | योगिराज वाघमारे |
| (3) | जेट युगातील मराठी माणूस | (iii) | ना. धो. महानोर |
| (4) | आम्ही कोण | (iv) | वामन चोरघडे |
| (5) | सांजावताना | (v) | शतंनुराव किर्लोस्कर |

प्र.3 सत्य/असत्य ते लिहा. (5)

(1) श्रावण महिन्यात खानदेशात पोळयाचा सण येतो.

(2) लेखकाच्चा भिडस्त स्वभावामुळे त्याचे खूप नुकसान होत होते.

(3) पाणी ओढताना स्त्रीया खाली वाकत कारण त्या वयस्क होत्या म्हणून.

(4) यंत्राचे कर्तृत्व पाहिले की मनुष्याचे मन थक्क होते.

(5) जनाबाईला विठ्ठलभक्तीचे संस्कार तुकाराम महाराजा कडून मिळाले.

प्र.4 एका वाक्यात/शब्दात उत्तरे लिहा. (5)

(1) समर्थ रामदासानुसार मुलांना भीक मागायची वेळ का आली?

(2) आम्ही कोणाचे लाडके आहोत असे कवी म्हणतो?

(3) महा + उत्सव शब्द जोडून एक शब्द तयार करा.

(4) त्या गावात टुमदार झोपडया आहेत. (विशेषण ओळखा)

(5) राम खेळायला जाईल, (काक ओळखा)

प्र.5 खालील वाक्प्रचाराचा अर्थ लिहा. (5)

(1) पाढ थोपटने

(2) हुकांर देण

(3) पाया घालणे

(4) थक्क होणे

(5) आकाश फाटणे

प्र.6 'अभाग्यांचे अश्रू' या शब्दातून कवीला काय सुचवायचे आहे? (2)

**किंवा**

पूरामुळे आपले सर्वस्व गेले हे कोणत्या ओळीतून व्यक्त झाले आहे?

प्र.7 शेतात भरघोस पीक आल्याचे श्रेय शेतकरी कोणाला देतो? (2)

**किंवा**

कोणत्या शक्तीच्या बळावर कवी या विश्वात विहार करू शकतो?

प्र.8 कोणाचे जीवन सर्वात हलाखीचे असते असे लेखकाने म्हटले आहे? (2)

**किंवा**

यशोदेच्या दिराने वाटी का फेकली?

प्र.9 कोणते तत्व दुधारी तलवारीसारखे आहे? (2)

**किंवा**

व्याख्यान देणाऱ्या बांईनी कोणता संदेश दिला?

प्र.10 पुढील शब्दातून शुद्ध शब्द निवडून लिहा. (2)

(1) त्र्यैलोक्य, त्रयलोक्य, त्र्येलोक्य

(2) बहमन्यान, बहम्ज्ञान, ब्रम्हज्ञान

किंवा

(1) सूकृत, सूक्रूत, सुकृत

(2) सम्रद्धी, समृद्धी, समरूद्धी

प्र.11 खाली दिलेल्या वाक्य समुहा बद्दल एक शब्द लिहा. (कोणतेही दोन) **(2)**

(1) ज्याला नाव देता येत नाही.

(2) सर्वासांठी खुले असलेले वाचनालय.

(3) शेती करणारा.

(4) लिहिता वाचता न येणारा.

प्र.12 काळाचे मुख्य प्रकार कीती आहे? त्याचे नाव लिहा. **(2)**

किंवा

पुढील वाक्य कोणत्या काळातील आहे ते लिहा.

(1) प्रयोग शाळेची उभारणी विद्यार्थी पाहत आहेत.

(2) सायकांळी गुरे आप आपल्या गोव्यात परत येतील.

प्र.13 खालील वाक्यातीला सर्वनाम ओळखा. **(2)**

(1) राधाचा आवाज गोड आहे, ती सुदंर गाते.

(2) सुधीर ची परीक्षा संपली म्हणून तो गावाला गेला.

किंवा

'नाम' म्हणजे काय? उदाहरणसहित लिहा.

प्र.14 'सांजावताना' कवीला कोणकोणती दृश्ये दिसतात? **(4)**

किंवा

संत तुकाराम महाराज साधू कोणाला म्हणतात?

प्र.15 भूकंपातून जे जिवंत राहिले त्यांची अवस्था कशी झाली आहे? **(4)**

**किंवा**

दूसऱ्यावर होणारे अत्याचार पाहून कवी का सतांपून उठतो?

प्र.16 पिंजऱ्यातील पक्ष्याची तुलना लेखकाने कशाशी केली आहे? **(4)**

**किंवा**

डॉ कार्व्हर यांना कोणते आव्हान स्वीकारायचे आहे?

प्र.17 सरकार जमिनी कोणाला वाटणार होते? सिरपाला अभिमान का वाटला? **(4)**

**किंवा**

पोळयाचा सण कोणत्या महिन्यात येतो? या सणाचे महत्व सांगा.

प्र.18 व्याख्यान देणारी बाई स्वतःला तरूण का म्हणवून घेते असे लेखकाला वाटते? **(4)**

**किंवा**

बाहेरून दिसणारी विहीर व वास्तवातील विहीर यात कोणता फरक आहे.

प्र.19 पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. **(4)**

(1) दास

(2) कृषी

(3) धन

(4) विश्व

**किंवा**

पुढील शब्दाचे विरूद्धार्थी शब्द लिहा.

(1) शत्रू

(2) जवळ

(3) अमृत

(4) पवित्र

प्र.20 पुराला पाहूणी व माहेरवाशीम का म्हटले? (5)

किंवा

जमिनीच्या अंगावर शहारे आले आहेत असे कवयित्री का म्हणते?

प्र.21 पुढील वाक्यांचे संदर्भसहित स्पष्टीकरण करा. (5)

'आम्हांला वगळा – गतप्रभ झणी होतील तारांगणे'

किंवा

नाते नवीन असे काही – जोडून आहोत आम्ही.

प्र.22 पुढील वाक्यांचा संदर्भ देऊन अर्थ स्पष्ट करा. (5)

निर्मळ मनाच्या माणसाला पाखरे अचूक ओळखतात.

किंवा

जीवन जगण्याचा मार्ग अश्या पळवाटामंधून जात नसतो.

प्र.23 परगावी असलेल्या आपल्या थोरल्या भावास आपल्या अभ्यासाची प्रगती सागंणारे पत्र लिहा. (5)

किंवा

'चित्रकला' स्पर्धेत राज्यात प्रथम आलेल्या आपल्या मित्राला अभिनंदनपर पत्र लिहा.

प्र.24 खालील उतारा वाचून त्वाच्याखाली दिलेल्या प्रश्नंाची उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहा. (5)

मला स्थळांपेक्षा माणसे अधिक आवडतात आणि माणसांपेक्षा पुस्तके काही स्थळे खूप आवडतात, पण बहुधा तेथील अनुभव आणि त्यांच्या आठवणी माझ्या आवडत्या माणसांशी जोडल्या गेल्या आहेत म्हणून निर्मनुष्य निसर्ग मला फारसा आवडत नाही, झेपत नाही. माणसे मिळाली नाहीत तर एखादे सुदंर पुस्तक घेऊन बसेन त्या देखण्या निसर्गाच्या सहवासातसुद्धा, माणसापेंक्षा पुस्तके आवडतात, कारण त्या पुस्तकांत माणसे असतात. प्रत्यक्ष

जीवनात माणसातंल्या, ज्या उणिवा मला बोचतात, त्या माझ्या निवडक पुस्तकांतल्या माणसांत नसतात. पुस्तकातंल्या त्या माणसांनी जन्मभर साथ दिली. तेथे प्रांजळ आचार व भावना मिळतात, आवडते माणूस व आवडते पुस्तक यांमध्ये निवड करण्याचा प्रसंग आला असता पुस्तक खाली पडते माणसाचा हात पटकन धरतो, त्यातील ऊब मला जाणवते.

(1) लेखकाला माणसांपेक्षा पुस्तके का आवडतात?

(2) कोणत्या प्रकारया निसर्ग लेखकाला आवडत नाही?

(3) पुस्तकातील माणसांचे विशेष कोणते?

(4) पुस्तक आणि माणूस यामध्ये निवड करायची असल्यास लेखक कोणाला निवडेल?

(5) योग्य ते शीर्षक लिहा.

प्र.25 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. **(10)**

(1) वृत्तपत्राचे महत्व

(2) विज्ञानाचे चमत्कार

(3) खेळाचे महत्व

(4) हमालाची जीवनव्यथा

(5) पहिला पाऊस

———————————